




दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १७२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.०२ फेब्रुवारी २०२५


## विठ्ठल रूक्मिणीमातेच्या विवाह सोहळ्यासाठी बेंगलोर येथील भाविकांकडून पोषाख



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०१, पंढरपूर :** श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचा विवाह सोहळा माघ शुध्द १ ते ५ या कालावधीत संपन्न होत असून, दिनांक ०२ फेब्रुवारी रोजी वसंत पंचमी निमित्त साजरा होणाऱ्या विवाह सोहळ्यासाठी पोशाख प्राप्त झाला आहे. हा विवाह सोहळा परंपरेनुसार पार पाडण्यात येणार असून, त्याची जय्यत तयारी मंदिर समितीने केल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

श्री रूक्मिणी स्वयंवर कथा दि. ३० जानेवारी ते ०१ फेब्रुवारी या दरम्यान दुपारी ४.०० ते ६.०० या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. परंपरेनुसार वसंत पंचमी दिवशी स.१०.०० ते १२.०० या वेळेत श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचा विवाह सोहळा संपन्न होत आहे. कथेचे निरूपण श्री क्षेत्र पंढरपूर येथील प्रख्यात श्रीमद् भागवताचार्य कु. साध्वी अनुराधा (दिदी) राजेंद्र शेटे यांचे सुमधूर व रसाळ वाणीने सुरू आहे. वसंत पंचमी दिवशी पहाटे काकडा आरती वेळेस श्री विठ्ठलास सोन्याच्या मुखुटा ऐवजी मंदिल पांढरे पागोटे घालण्यात येते. (या दिवसापासुन श्री विठ्ठलास पांढरा पोशाख रंगपंचमी पर्यत सुरू होतो.) पहाटे नित्यपुजेच्या वेळेस देवास गुलाल टाकण्यात येतो तसेच श्री रूक्मिणी मातेकडे काकडा आरती व नित्यपुजेच्या वेळेस वसंत पंचमी निमित्त फक्त याच दिवशी सकाळी पांढरा पोशाख करण्यात येतो (इतर वेळी श्री रूक्मिणी मातेस पांढरा पोशाख परीधान करीत नाहीत) नित्यपुजेच्या वेळेस रूक्मिणी मातेस गुलाल टाकण्यात येतो. सकाळी ११.०० वा. श्री विठ्ठलाची तुळशी पूजा करण्यात येते. त्यावेळेस श्रीस पांढरा पोशाख करण्यात येतो. तसेच श्री विठ्ठलास गुलाल टाकुन श्रीस विवाह स्थळी येण्याचे निमंत्रण दिले जाते. तसेच श्री रूक्मिणी मातेस पांढरा पोशाख व अलंकार परीधान केले जातात. त्यानंतर श्री रूक्मिणी मातेची पाद्यपुजा करून नैवेद्य, आरती करण्यात येते. श्री रूक्मिणी मातेस गुलाल टाकला जातो व रूक्मिणी मातेस विवाह स्थळी येण्याचे निमंत्रण दिले जाते. दु.१२.०० वाजता श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी मातेची प्रतिकात्मक मुर्ती श्री विठ्ठल सभामंडपामध्ये आणुन विधीवत मंत्र उच्चारासहीत विवाह सोहळा संपन्न होतो. तद्नंतर दुपारी ४.०० वाजता पोशाखानंतर श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी मातेची पाद्यपुजा करण्यात येते. त्यानंतर श्री विठ्ठल व रूक्मिणी मातेच्या प्रतिकात्मक मुर्तींची प्रदक्षिणा मार्गाने सवाद्य शोभा यात्रा काढण्यात येते. व्ही.आय.पी. गेट - श्री संत नामदेव पायरी महाव्दार पोलीस चौकी - कालिका देवी मंदिर - काळा मारूती चौफाळा नाथ चौक तांबडा मारूती मंदिर माहेश्वरी धर्मशाळा - महाव्दार पोलीस चौकी श्री संत नामदेव पायरी पश्चिमव्दार व्ही. आय.पी. गेट या मार्गाने शोभा यात्रा काढण्यात येणार आहे. श्रींसाठी बेंगलोर येथील सविता चौधरी व इतर दोन भाविकांकडून पोषाख प्राप्त झाले आहेत. सदरचा सोहळा जास्तीत जास्त भाविकांना पाहता यावा यासाठी चौफाळा व महाद्वार पोलीस चौकी येथे एलईडी स्क्रिन बसविण्यात येणार आहेत. तसेच त्याच ठिकाणी अक्षता वाटप होणार आहे. त्यादिवशी दुपारी १२ ते सायं. ७ पर्यंत अन्नछत्र सुरू ठेवण्यात येणार असल्याचेही मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री. श्रोत्री यांनी सांगितले.

## सिमेंटचा गाळ रस्त्यावर टाकणाऱ्या वाहनावर कारवाई करीत ३० हजार दंडवसूली



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०१, नवी मुंबई :** बांधकामासाठी वापरण्यात येणारे सिमेंट काँक्रिट मिश्रीत पाणी रस्त्यावर सोडून दिल्याने त्या ठिकाणी काँक्रिटचा चिखल होऊन वाहने घसरुन अपघात होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत होत्या. त्या अनुषंगाने परिमंडळ २ च्या अतिक्रमणविरोधी भरारी पथकाने परिमंडळ २ चे उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली धडक कारवाई करीत ज्या वाहनाद्वारे रस्त्यावर काँक्रिटचा चिखल रस्त्यावर सोडण्यात येत होता ते वाहन ताब्यात घेतले तसेच त्यांच्याकडून ३० हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. शहर स्वच्छतेला बाधा आणणाऱ्या घटकांविरोधात महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार कारवाई करण्यात येत आहे.


### * Name Change *

I, Ramesh Hauserao Salve (Old, Present Name) Address - MS/RB-II, 1/18, Sect. -22, Jui Nagar, Navi Mumbai 400706, permanently changing Ramesh Hauserao Salvee (X-97181-A) (New Name) from Ramesh Hauserao Salve for Government and other work.


# केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी काय?

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सांगितले...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, मुंबई :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज (१ फ ेब्रुवारी) अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात वेगवेगळ्या क्षेत्रासांठी अनेक मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. ज्यामध्ये १२ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्यांसाठी मोठा दिलासा देण्यात आला आहे.

त्याबरोबर शिक्षण, शेती, रोजगार, उत्पादन, लघू उद्योगासह विविध क्षेत्रासाठी महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. यादरम्यान विरोधी पक्षातील नेत्यांनी मात्र या अर्थसंकल्पावर टीका केली आहे. काँग्रेसचे नेत्यांनी अर्थसंकल्पात म हाराष्ट्राची निराशा करण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. यादरम्यान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी का देण्याच आलं? याची माहिती दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट केली आहे. यामध्ये महाराष्ट्राच्या वाट्याल अर्थसंकल्पात काय आलं याची माहिती देण्यात आली आहे.

**केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्र!**



(**टिप** : ही केवळ प्राथमिक माहिती. विविध मंत्रालयांची तरतूद तसेच रेल्वेची आकडेवारी सविस्तरपणे येईल.)

मुंबई मेट्रो : १२५५.०६ कोटी
पुणे मेट्रो : ६९९.१३ कोटी
एमयुटीपी : ५११.४८ कोटी
एमएमआरसाठी एकात्मिक आणि हरित प्रवासी सुविधा: ७९२.३५ कोटी
मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे : ४००४.३१ कोटी
सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनॉमिक क्लस्टर : १०९४.५८ कोटी
महाराष्ट्र ग्रामीण जोडसुधार प्रकल्प: ६८३.५१ कोटी
महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क : ५९६.५७ कोटी
नागनदी सुधार प्रकल्प : २९५.६४ कोटी
मुळा-मुठा नदी संवर्धन : २२९.९४ कोटी
ऊर्जा कार्यक्षम उपसा सिंचन प्रकल्प : १८६.४४ कोटी

केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्र!
(टिप : ही केवळ प्राथमिक माहिती. विविध मंत्रालयांची तरतूद तसेच रेल्वेची आकडेवारी सविस्तरपणे येईल.)

- मुंबई मेट्रो : १२५५.०६ कोटी
- पुणे मेट्रो : ६९९.१३ कोटी
- एमयुटीपी : ५११.४८ कोटी
- एमएमआरसाठी एकात्मिक आणि हरित प्रवासी सुविधा: ७९२.३५ कोटी

**पृथ्वीराज चव्हाणांची टीका!**

काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना काही महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले आहेत. लोकसभा निवडणुकीनंतरचा हा पहिला अर्थसंकल्प आहे. यामध्ये केंद्र सरकारने एक गोष्ट मान्य केली आहे की भारतीय अर्थव्यवस्थेचा विकासदर हा मंदावत आहे. विकासदर मंदावत असल्यामुळे त्याचे अनेक परिणाम होत आहेत. रोजगार निर्माण होत नाहीत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबत नाहीत. कृषी अर्थव्यवस्था कोलमडलेली आहे. या अर्थसंकल्पात महागाईवर काहीही उपाययोजना केलेली नाही. आम्हाला अपेक्षा होती की अर्थसंकल्पाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेचे अश्रू पुसण्याचं काम हे सरकार करेल. मात्र, असं काहीही झालं नाही. त्यामुळे या अर्थसंकल्पामुळे आमची घोर निराशा झालेली आहे, अशी टीका पृथ्वीराज चव्हाण यांनी केली आहे.

राहुल गांधींनी काय म्हटलं?

बंदुकीच्या गोळ्यांच्या जखमांवर ही मलमपट्टी करण्यात आली आहे. जागतिक अनिश्चिततेच्या काळात आपल्या आर्थिक संकटाचे निराकरण करण्यासाठी एक आदर्श बदल करणं आवश्यक होतं. पण हे सरकार विचारांनी दिवाळखोर आहे, अशी टीका सोशल मीडिया फ्लॅटफॉर्म एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये केली आहे.

## एसटीत 'यूपीआय'चा नवा अध्याय! प्रवाशांना डिजिटल तिकीट सुविधा उपलब्ध

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१, डोंबिवली (ठाणे) :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) प्रवाशांसाठी डिजिटल तिकीट सेवा सुरू केली असून, प्रवासी आता यूपीआय (युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस) च्या माध्यमातून सहज आणि कॅशलेस तिकीट खरेदी करू शकतात.

सुट्ट्या पैशांवरून होणारे वाद टाळण्यासाठी आणि प्रवाशांना सोयीस्कर सेवा देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे एसटी बसमधील कॅश ट्रान्झॅक्शनचा भारही कमी होईल आणि वाहकांना सुट्ट्या पैशांची समस्या भेडसावणार नाही. एसटी महामंडळाच्या या नव्या उपक्रमाला प्रवाशांकडून उत्स्फ




ूर्त प्रतिसाद मिळत आहे. मागील काही दिवसांत यूपीआय पेमेंटद्वारे तिकीट खरेदीचे प्रमाण दुपटीने वाढले आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या सुविधेची अंमलबजावणी तातडीने करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, महामंडळाने क्यूआर कोड स्कॅन करून तिकीट भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे महामंडळाने एका परिपत्रकाद्वारे वाहकांना १०० रुपयांपर्यंत सुट्टे पैसे उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. यामुळे प्रवासी आणि वाहकांमधील गैरसमज आणि वाद कमी होतील प्रत्येक एसटी बस वाहकाला अँड्रॉइड इलेक्ट्रॉनिक तिकीट इशू मशीन देण्यात आले आहे. या मशीनद्वारे प्रवासी यूपीआय वापरून तिकीट खरेदी करू शकतात.

महामंडळाने प्रवाशांना आवाहन केले आहे की, जास्तीत जास्त यूपीआय पेमेंटचा उपयोग करावा आणि रोख व्यवहार टाळावेत. यूपीआय तिकीट प्रक्रियेदरम्यान अडचण आल्यास किंवा तिकीट मिळाले नाही, तर प्रवाशांसाठी २४ तास हेल्पलाइन सेवा सुरू करण्यात आली आहे.

> यूपीआय पेमेंट यशस्वी ठरल्यानंतर, एसटी महामंडळ ॲप-आधारित बुकिंग, ऑनलाइन पास नूतनीकरण आणि संपूर्ण कॅशलेस प्रवास प्रणाली कार्यान्वित करण्याच्या दिशेने पुढे जात आहे.एसटी महामंडळाने प्रवाशांना या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. भविष्यात एसटी तिकीट प्रक्रियेत आणखी डिजिटल सुधारणा करून, प्रवाशांसाठी सुलभ आणि तंत्रज्ञान-संलग्न सेवा प्रदान करणार असल्याचे प्रशासनाने सांगितले.
>
> **- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ**

## महाराष्ट्रात लवकरच समान नागरी कायदा लागू होईल - डॉ. नीलम गोऱ्हे

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, पुणे :** जेंडर पॅरिटी (लिंगभाव समानता) आणण्यासाठी देशात समान नागरी कायदा लागू झाला पाहिजे. त्यातून महिलांना खऱ्या अर्थाने न्याय मिळेल. महाराष्ट्रात लवकरच समान नागरी कायदा लागू होईल, असे संकेत विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शनिवारी दिले. 'न्यायदेवता डोळ्यावरील पट्टी काढून महिलांना न्याय देण्याचे काम करीत आहे. फौजदारी व दिवाणी न्यायालयांमध्ये निकालपत्र मराठी भाषेत देण्यासाठी मराठी भाषा विभागाने कार्यवाही करावी,' असे निर्देशही त्यांनी दिले.

विश्व मराठी संमेलनाच्या आचार्य प्र. के. अत्रे मंचावर (ॲम्फी थिएटर) 'महिलांविषयक कायदे व न्याय मराठी भाषेत' या विषयावरील परिसंवादात उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे आणि ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. उज्वल निकम यांनी आपले विचार मांडले. यावेळी डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये, अशी म्हण आहे. परंतु, न्यायव्यवस्थेत अनेक शहाणी माणसे पीडितांना




न्याय मिळवून देण्याचे काम करतात. १९८० नंतर महिलांविषयक कायद्यांमध्ये विविध बदल झाले आहेत. पोलिसांपासून न्यायव्यवस्थेत लिंगभाव संवेदनशीलता आली आहे. त्यातून न्यायव्यवस्था सक्षम होत असून, महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढत आहे. महाराष्ट्र सरकारने सर्व फौजदारी आणि दिवाणी न्यायालयांची भाषा मराठी असेल हा निर्णय घेतला आहे. परंतु,अद्याप दोन्ही न्यायालयांमध्ये निकालपत्रे मराठी भाषेतून दिली जात नाहीत.

त्यासाठी अनुवादक आणि प्रतिवेदकांची संख्या कमी असून, ही अडचण दूर करण्याची कार्यवाही मराठी भाषा विभागाने करावी. अशी भूमिका यावेळी त्यांनी मांडली. यावेळी ॲड. उज्वल निकम म्हणाले, कायद्याची भाषा ही सर्वसामान्यांना समजेल अशा प्रकारची असावी. महिलांनीही आत्मविश्वास जागवून मातृभाषेच्या आधारे आपल्यावरील अत्याचारांना वाचा फोडत न्याय मागितला पाहिजे. अत्याचारविरोधी कायद्यांमधील कठीण शब्दांना सोपे पर्यायी शब्द शोधले पाहिजेत. हे कायदे सोप्या भाषेत पुस्तिकेतून समाजात पोहोचविले पाहिजेत. 'गुड टच, बॅड टच'बाबत मराठी भाषेचा वापर करून समाजात संवेदनशीलता निर्माण केली पाहिजे. त्यातून पीडितांचे अधिकार अधोरेखित होऊन, त्यांना न्याय मिळेल. अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

महिलांवरील हिंसाचाराच्या घटना वाढत असून, अनेक जण त्याकडे मूकपणे बघत असतात. महिलांवर अत्याचार होत असतानाच पीडितेसह समाजाने गुन्हेगाराला रोखून प्रतिकार केला पाहिजे. 'ओटीटी प्लॅटफॉर्म'वरील चित्रपटांमध्ये असलेला हिंसाचार, शिवीगाळ यांचा परिणाम मुलांवर होत आहे. त्यामुळे शाळा-महाविद्यालयांसह घरातूनही मुलांवर संस्कार झाले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

## संपादकीय

### 'इस्रो'चे शतकी उड्डाण

आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील 'इस्राो'च्या 'एनव्हीएस-०२' या दळणवळण उपग्रहाचे बुधवारी पहाटे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले. या प्रक्षेपणाने भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने ('इस्राो') दिमाखदारपणे शतकी कामगिरी पूर्ण केली आहे. व्ही नारायणन यांनी १६ जानेवारीला 'इस्राो'ची सूत्रे हाती घेतल्यानंतरही ही पहिलीच मोहीम आहे. ५०.९ मीटर उंचीचे भूस्थिर उपग्रह प्रक्षेपण यान (जीएसएलव्ही-एफ १५) प्रक्षेपक बुधवारी पहाटे ६.२३ या नियोजित वेळेत अवकाशात झेपावले. काळोख्या आणि ढगाळ आकाशात १९ मिनिटे प्रवास केल्यानंतर रॉकेटपासून पेलोड यशस्वीपणे वेगळे झाले. याच्या वरील टप्प्याचे क्रायोजेनिक इंजिन स्वदेशी बनावटीते आहे. यान अवकाशात झेपावल्यानंतर 'इस्राो'च्या शास्त्रज्ञांनी आनंद साजरा केला.

'एनव्हीएस-०२' हा भारतीय प्रादेशिक दळणवळण उपग्रह मालिकेतील (एनएव्हीआयसी) दुसरा उपग्रह आहे. भारतीय भूभागापलीकडे दीड हजार किलोमीटरपर्यंत हा उपग्रह सेवा पुरवणार असून त्यामुळे भारतीय उपखंडातील नागरिकांना अचूक स्थान, वेग, वेळ मिळणार आहे. या मोहिमेची २७.३० तासांची उलटगणती मंगळवारी पहाटे २.५३ वाजता सुरू झाली होती. 'जीएसएलव्ही-एफ-१२' मधून २९ मे २०२३ रोजी 'एनव्हीएस-०१' हा उपग्रह अवकाशात सोडण्यात आला होता. 'एनएव्हीआयसी'मध्ये दुसऱ्या पिढीच्या पाच उपग्रहांचा समावेश आहे. 'एनव्हीएस-०१' पासून 'एनव्हीएस-०५' अशी या उपग्रहांची नावे आहेत. या उपग्रहांमुळे अत्याधुनिक यंत्रणा तयार होणार आहे.

**उपग्रहाची वैशिष्ट्ये**

* 'एनव्हीएस-०२' उपग्रहाची रचना आणि निर्मिती यू. आर. उपग्रह केंद्रामध्ये झाली आहे. २,२५० किलो उपग्रहाचे वजन आहे.

* भूभागावर, हवाई आणि सागरी, कृषी क्षेत्रात अचूक वेळ, वेग सांगण्यासाठी याचा उपयोग होईल. मोबाइलमध्ये लोकेशन अचूक दाखविण्यासाठी त्याचा उपयोग होईल. 'इस्राो'च्या या वर्षातील पहिले यशस्वी उड्डाण झाल्याचे जाहीर करताना मला अतिशय आनंद होत आहे. 'जीएसएलव्ही-एफ १५'ने हा 'एनव्हीएस-०२' हा उपग्रह अपेक्षित कक्षेत सोडला आहे.

**– व्ही नारायणन, प्रमुख, 'इस्राो'**

# वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकाला विरोध नको !




वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक आता जवळपास अंतिम टप्यात आले आहे. याबाबत निर्णय घेण्यासाठी मध्यंतरी सत्ताधारी आणि विरोधक यांच्याकडून सुधारणा मागवण्यात आल्या होत्या. आलेल्या सुधारणांवर संयुक्त संसदीय समितीने सारासार विचार करून सत्ताधारी पक्षाने सुचवलेल्या सुधारणांपैकी १४ सुधारणा मान्य केल्या आहेत, तर विरोधकांनी केलेल्या ४४ सुधारणा फेटाळल्या आहेत यावरून सध्या राजकीय वातावरण तापले आहे.

देशातील कोणत्याही भूमीवर मालकी हक्क सांगून ती ताब्यात घेण्याचा अधिकार बहाल करणारा वक्फ बोर्ड कायदा भारतात असल्याचे अनेकांना ज्ञातही नसावे. या वक्फ बोर्ड कायद्याचे नियमन करणारी वक्फ बोर्ड ही संस्था केवळ मुसलमानांचीच नव्हे, तर हिंदूंच्या परंपरागत जमिनीवरही आपला अधिकार सांगू शकते. हिंदूंच्या एखाद्या भूमीवर वक्फ बोर्डाने एकदा दावा केला की त्याविषयी न्याय मागण्यासाठी तुम्हाला पोलिसांत तक्रार नोंदवता येणार नाही किंवा कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही. दाद मागायचीच असेल तर त्यासाठी वक्फ न्यायाधिकरणाकडे जावे लागते. वक्फ बोर्डाने दावा सांगितलेली भूमी तुमची कशी हे तुम्हाला स्वतःहून या ठिकाणी सिद्ध करायचे असते. ज्याठिकाणी न्याय देणारी सर्व यंत्रणा ही वक्फ बोर्डाचीच असते. अशा ठिकाणी एखाद्या हिंदूला कधीतरी न्याय मिळू शकतो का ? वक्फ बोर्ड किंवा वक्फ कायदा आज पाकिस्तानसह कोणत्याही मुस्लिम राष्ट्रात नाही. असा कायदा बहुसंख्य हिंदू असलेल्या हिंदुस्थानात आहे याचे कोणालाही नक्कीच आश्चर्य वाटेल.

या वक्फ बोर्डाची स्थापना १९५४ साली केंद्र सरकारनेच केली असून आज देशभरात असे ३० हुन अधिक वक्फ बोर्ड आहेत. १९९५ च्या वक्फ कायद्याच्या कलम तीनमध्ये असे लिहिले आहे की वक्फला कोणतीही जमीन आपली आहे, असे वाटत असले तरी ती त्याची मालमत्ता असेल. वक्फ बोर्डाला हे सिद्ध करण्याचीही गरज नाही. वक्फ बोर्डाने एखाद्या व्यक्तीच्या जमिनीवर हक्क सांगितला आणि ही जमीन वक्फची असल्याचे सांगितले तर ती चुकीची सिद्ध करण्याची जबाबदारी वर उल्लेख केल्यानुसार त्या जमिनीच्या मालकाची असेल. जर न्यायाधिकरणाने मालकाची आवृत्ती स्वीकारली नाही, तर न्यायालयही हा निर्णय बदलू शकत नाही. एखादी जमीन एकदा वक्फची झाली कि ती कायमस्वरूपी वक्फचीच होऊन जाते. त्या जमिनीवरील स्थावर जंगम मालमत्ताही वक्फच्या अधिकारात येते.

वक्फ हा अरबी शब्द आहे ज्याचा अर्थ राहणे असा असून देवाच्या नावाने अर्पण केलेली वस्तू असाही त्याचा एक अर्थ सांगितला जातो. वक्फ म्हणजेच कोणत्याही मुस्लिमाने धार्मिक कार्यासाठी दान केलेली मालमत्ता. १९९५ साली देशात पी.व्ही. नरसिंहराव सरकार असताना सरकारने १९५४ च्या वक्फ कायद्यात सुधारणा करून वक्फ बोर्डाला अमर्याद अधिकार बहाल केले. ज्यामुळे दानधर्म राहिला बाजूला भारतातील वक्फ बोर्ड हिंदूंच्याच भूमीवर अधिकार सांगून ती भूमी ताब्यात घेऊ लागला आहे. वक्फ कायदा १९९५ चे कलम ४० म्हणते की, एखादी जमीन कोणाची आहे, हे 'वक्फ बोर्ड' ठरवेल. वक्फला जर एखादी जमीन आपल्या आपल्या मालकीची वाटल्यास, ती जमिन वक्फ बोर्डाची होईल. तामिळनाडू राज्यातील त्रिची जिल्ह्यात तिरुचेंथुराई नावाचे एक गाव आहे. या गावातील ९५ टक्के लोक हे हिंदू आहेत, याच गावात १५०० वर्षं जूने एक मंदिरदेखील आहे. एक दिवस वक्फ बोर्डाने या संपूर्ण गावालाच आपली मालमत्ता म्हणून घोषित केले. इस्लामचा जन्म होण्याआधी बांधलेले मंदिर देखील आपल्या भूमीवर बांधल्याचा दावा वक्फ बोर्डाने केला. देशभरात अशी अनेक उदाहरणे आहेत ज्यामध्ये वक्फ बोर्डाने मोठमोठ्या भूभागांवर आपला दावा सांगत तो भूभाग ताब्यात घेतला आहे. देशातील सर्व वक्फ बोर्डांकडे मिळून आज एकूण ८ लाख, ५४ हजार, ५०९ एकर एव्हढी भूमी आहेत. देशातील एकूण भूमीचा विचार केल्यास सर्वाधिक भूमी आज लष्कराच्या ताब्यात आहे तर दुसऱ्या क्रमांकाला सर्वाधिक भूमी रेल्वे खात्याकडे आहे ही दोन्ही खाती केंद्र सरकारच्या अखत्यारीतील आहेत आणि तिसऱ्या क्रमांकाची सर्वाधिक भूमी ही आज गैर सरकारी वक्फ बोर्डाकडे आहे यावरून देशातील वक्फ बोर्डाचा व्याप भारतात किती मोठ्या प्रमाणात पसरला आहे हे आपल्या लक्षात येईल. तत्कालीन सरकारने एकगठ्ठा मताच्या लाचारीसाठी वक्फ बोर्डाला दिलेल्या अमर्यादित अधिकारांमुळे आजमितीला देशभरातील लक्षावधी एकर जमीन वकफ बोर्डाने आपल्या ताब्यात घेतली आहे. सामान्य जनतेच्या न्यायहक्कासाठी संविधानाने दिलेले कायदेसुद्धा वकफ बोर्डापुढे हतबल असल्याने जनतेची परंपरागत भूमी वकफ बोर्डाच्या घशात घालणे हा नागरिकांवरील अन्यायच आहे. या अन्यायातून नागरिकांना दिलासा देण्यासाठी वकफ बोर्ड कायद्यात सुधारणा होणे अनिवार्य असून त्यासाठी देशातील समस्त हिंदूंनीं एकत्र यायला हवे. असे असताना काही हिंदु राजकीय नेतेच एका समाजाला खुश करण्यासाठी या सुधारणा विधेयकाच्या विरोधात उभे ठाकल्याचे चित्र सध्या दिसत आहे. देशातील बहुसंख्य हिंदु समाज हळूहळू जागृत होऊ लागला आहे. आपल्या न्याय हक्कासाठी व्यक्त होऊ लागला आहे. अशावेळी एका गटाच्या संतुष्टीसाठी प्रवाहाच्या विरोधात भूमिका मांडणे राजकीय मंडळींना हानिकारक ठरू शकते. केवळ राजकीय विरोधासाठी विरोध केला जात असेल तर अशांना जनता निवडणुकातून धडा शिकवल्यावाचून राहणार नाही.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा सांगता सोहळा उत्साहात संपन्न

**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.०१, कल्याण (ठाणे) :** मराठी भाषा संवर्धनासाठी राज्य शासनाच्या निर्देशानुसार व महानगरपालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या निर्देशानुसार मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा सांगता सोहळा दि.२८ जानेवारी २०२५ रोजी कल्याण पश्चिम येथील सिटी पार्क येथे उत्साहात संपन्न झाला.



यावेळी महानगरपालिकेने अधिकारी व कर्मचारी वर्गासाठी मराठी गीत गायन स्पर्धा, मराठी हस्ताक्षर स्पर्धा, चारोळी स्पर्धा आणि महापालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी मराठी निबंध स्पर्धा, म्हणी, वाकप्रचार स्पर्धा इतर महानगरपालिका क्षेत्रातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पेहराव मराठी भाषा स्पर्धा, लावणी स्पर्धा इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर मराठी भाषेचे वैभव जपणे, मराठी भाषेचे संवर्धन करणे, मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर करणे आवश्यक असून त्यादृष्टीने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या विविध कार्यक्रमांमध्ये बिर्ला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एक झाड एक कविता, पथनाट्य, सोनावणे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अक्षर दिंडी, मंगळागौर, प्रगती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिवचरित्र असे बहारदार कार्यक्रम सादर केले.

हा कार्यक्रम बिर्ला महाविद्यालयाचे संचालक डॉ.नरेश चंद्र, उपआयुक्त प्रसाद बोरकर, संजय जाधव व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, पालक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे सचिव तथा मराठी भाषा अधिकारी किशोर शेळके यांनी केले.

## विंचूर जिल्हा परिषद शाळेत विविध गुणदर्शन कार्यक्रम संपन्न

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**
**दि.१, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटन दीप प्रज्वलन व सरस्वती पूजन करुन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष व उद्घाटक निफाड पंचायत समिती शिक्षण विभागाचे लासलगाव बिटाचे बिटाधिकारी अधिकारी मान. वसंतराव गायकवाड तसेच विंचूर चे प्रथम नागरिक सचिन दरेकर, पत्रकार सुनील क्षिरसागर, पत्रकार मच्छिंद्र साळुंके, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष वैभव दरेकर, सो.सा.माजी चेअरमन वसंत गायकवाड, मुकुंद झाल्टे, गणेश चव्हाण, माऊली दरेकर, गोविंदा अहिरे, अभय चव्हाण, सुनील दरेकर, ज्ञानेश्वर दरेकर तसेच ग्रामपालिका सदस्या पूजा जेऊघाले, प्रियंका सोनवणे, जयश्री भोसले, संगीता जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी आपली कला व नृत्याविष्कार यांचे सादरीकरण केले.या कार्यक्रमात विविध गाण्यांवर समूहगीते, लावणी, देशभक्तीपर गीते यावर ३० समूह नृत्य,६ वैयक्तिक नृत्य विद्यार्थ्यांनी सादर केले.

### बजेट..

तयार करणे बजेट
मुळीचं नाही सोपे
कितीही दे भरभरू
समोरचे कसे कोपे

वरुन भरली झोळी
खालून हळूचं कापे
काळापैसा फोफावे
कधी पाडणारं छापे

गरीब बनला दरिद्री
न् गडगंज नोट छापे
आकड्यांचा रे खेळ
डोळे चकाचक दिपे

हटणारं उद्या गरिबी
नारायण शांत झोपे
दारूगोळाठासलेला
सामान्यद्यायचे तोफे

सवलती जग जाहीर
दिसत नाही कर छुपे
भरले काही रिकामे
सांभाळे विविधकप्पे

लक्ष द्यावे सगळीकडे
बजेटला असंख्यटप्पे
दिखावा देखाव्यांचा
हळूवारं मतदारां जपे

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# अभंग तुकाराम...

अभंग म्हटले की तुकोबा अन तुकोबा म्हटले कि,अभंग डोळ्यासमोर आल्याशिवाय राहत नाही. महाराष्ट्र संत परंपरेच्या संत साहित्यिकांच्या लेखन शैलीतील काव्यप्रकार म्हणजे अभंग.

विशेषतः पंढरीच्या पांडुरंगाची स्तुती करण्यासाठी रचलेला हा भक्तिमय काव्यप्रकार आहे. सर्वसामान्य भाषेत अभंग म्हणजे कधीही भंग न पावणारा...! पंढरीच्या विठ्ठलाचे सत्य वास्तव व अनुभूतीचे यथार्थ दर्शन तुकोबारायांनी अभंगांच्या माध्यमातून जगासमोर मांडले आहे. तुकोबांनी हाती घेतलेल्या लेखणीला अन वाचेला विठुरायाच्या कृपेने गती मिळाली. त्याकाळी परमेश्वर चिंतन, गायन,लेखनाचा अधिकार केवळ उच्चवर्णीयांनाच, परंतु हे बहुजनांच पोरग विठ्ठलाच्या स्तुती पर गायन करतंय,लिखाण करतंय,हे तत्कालीन उच्च वर्णी यांना खटकल्यावर तुकोबाला त्यांनी छळण्याचा सर्वोत्परी प्रयत्न केला. लिहिलेले अभंग इंद्रायणी नदीमध्ये बुडवण्याचे आदेश दिले. मात्र कधीही भंग न पावणारे अभंग व गाथा इंद्रायणी नदीत प्रभूरामाच्या सेतूनिर्मितीसाठी जसे राम नामाचे पाषाण तरंगले,तसेच भंग न पावणारे या तुकारामाचे अभंग तरंगले आणि हे बुडवण्याच्या आदेश देणाऱ्या रामेश्वर भटाने तुकोबाचे चरण धरून माफी मागून माफी मागितली.

हजारो वर्षापासून आदर्श राजा श्रीराम चंद्रप्रभूच्या नावाने राम राम म्हटल्या जाणाऱ्या प्रथेला कित्येक परकीय इतर धर्मियांनी भारतीय समाजाला जातीपातीमध्ये धर्माधर्मा विभागून खिळखिळी करण्याचा प्रयत्न केला परंतु, या काळातही दिवसाची सुरुवात राम – रामनेच होते. ते भंग पावले नाही त्याला खंडही पडला नाही त्याचप्रमाणे, अभंग आणि तुकोबाला अज्ञातांनी मिटवण्याचा प्रयत्न केला परंतु, ते मुळीच शक्य नाही कारण ती निर्मिती सामान्य नाही. प्रत्यक्षात परमेश्वराची गुण व महती त्यात वर्णिली आहे. एवढेच नाही तर, अभंग रचना ही निर्दोष आहे त्यात कुठलाही दोष नाही. कित्येक संत, साहित्यिक तत्त्वज्ञानांनी,तुकोबाच्या अभंगांची प्रचिती डोळ्याने बघितली व अनुभवली. काही अज्ञानांनी सत्य – असत्य पडताळण्याचा प्रयत्न केला. काहींनी विचित्र लिखाण करून तुकोबाला देव न मानणारा, विद्रोही साहित्यिक, कवी म्हणून घोषित करण्यासाठी लिखाणाअंती तुका म्हणेलिहून बदनाम करण्याचा प्रयत्न केला. तरीही हा अभंग तुकाराम मात्र पर्वताप्रमाणे खंबीर सूर्य प्रकाशाप्रमाणे सत्य व स्वच्छ असा अभंगच...!राहिला. अहो! त्या अति कठीण प्रसंगाच्या काळात हे सर्व काही खटाटोप,



करामती शक्य झाल्या नाहीतर,आता कशा शक्य आहे?

आज साडेतीनशे वर्षानंतरही अभंग -गाथेचे वर्चस्व कायम आहे.हजारो, लाखो कीर्तनकार, तत्त्वज्ञ, संशोधक, अभ्यासकांनी या ज्ञानगाथेचा विस्तार अजून वाढवला व अजूनही वाढत राहील. छोट्या- छोट्या अभंगरूपी नद्यातून सकल तुकाराम गाथा हा ज्ञानसागर आहे.नदी जशी संथ गतीने सतत वाहणारी अथांग न आटणाऱ्या सागराला मिळते तसेच, तुकोबाचे नदीरुप अभंग न आटणाऱ्या महासागराप्रमाणे तुकोबांची सकलगाथा ही नावाप्रमाणे कायम न भंगणारी न आटणारी अशी आहे. आज तुकोबाचे हजारो अभंग गायकांनी तालासुरात गायले आहेत. कीर्तनकार दररोज कित्येक जिल्ह्यात, महाराष्ट्र,देशभरच नव्हे तर विदेशातही अभंगांचे निरूपण करत आहे त्याचप्रमाणे,टीव्ही चॅनेलवर सुद्धा दररोज सकाळ संध्याकाळ तुकोबाच्या अभंगावर आधारित भजन कीर्तन,प्रवचन यावर आधारित कार्यक्रम चालू आहे. अर्थात तुकोबाचे विचार, अभंग आणि गाथा भूत, वर्तमान व भविष्याचा वेध घेणारी आहे.येणाऱ्या पिढीसाठी सुद्धा अभंग तुकोबा प्रत्येकाच्या ओठी, हृदयी,भक्ती, अध्यात्म अन नीतिमूल्याच्या शिक्षणारूपाने विराजमान असणार आहे.

**जगदंगुरूंना जयंतीनिमित्त शुभेच्छा.**
**सप्रेम राम कृष्ण हरी....!**
**विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलढाणा**
**मो.९७६३२८२०७७**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## नवशी येथे गौरी गणेश जाखडी नृत्य स्पर्धेचे आयोजन

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०१, मुंबई :** कोकणात सर्वाधिक लोकप्रिय असणारी कलगी तुरा (जाखडी नृत्य) लोककलेच्या संवर्धनासाठी अग्रेसर असणारी महाराष्ट्रातील अग्रगण्य संस्था,कलगी तुरा समाज उन्नती मंडळ-मुंबई वतीने रायगड, रत्नागिरी जिल्हा स्तरीय गौरी गणेश जाखडी नृत्य स्पर्धा २०२४-२५ चे आयोजन करण्यात आले असून शनिवार दिनांक ०८ फेब्रुवारी २०२५ रोजी रात्री ०९ वाजता, नवशी शाळा (विद्यामंदिर प्रांगणात) मु.नवशी ता.दापोली जि. रत्नागिरी या नियोजित स्थळी संपन्न होणार आहेत.

सहभागी स्पर्धकांतून विजेत्यांना प्रथम पारितोषिक ११०००/- द्वितीय पारितोषिक ७०००/- तृतीय पारितोषिक ५०००/- सह आकर्षक स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे,त्याचबरोबर उत्कृष्ट गायक पारितोषिक-करा ओके माईक, उत्कृष्ट ढोलकी पट्टू -ढोलकी सह आकर्षक सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविले जाणार आहे. तसेच सदर कार्यक्रमावर वरिष्ठ/युवा शाहीर यांचा गुणगौरव सोहळाही संपन्न होणार असल्याचे उपरोक्त संस्थेचे सरचिटणीस संतोष धारशे यांनी अक्षराज मिडीयाला अधिक माहिती देताना सांगितले.

## दुग्धव्यवसाय प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा वापर करून स्वत:च्या उन्नती बरोबरच गावाची उन्नती करा



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.३१, उदगीर (लातूर) :** उदगीर उन्नत भारत अभियानांतर्गत पशुवैद्यकीय महाविद्यालय उदगीरच्या दत्तक ग्राम असलेल्या पिंपरी ता. उदगीर येथील पशुपालक शेतकऱ्यांसाठी किफायतशीर दुग्धव्यवसाय या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षणाचे पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर येथे डॉ. नंदकुमार गायकवाड, सहयोगी अधिष्ठाता यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणामध्ये एकूण २६ प्रशिक्षणार्थीनी सहभाग नोंदविला. या प्रशिक्षणा दरम्यान ११ व्याख्याने व ५ प्रात्यक्षिके, १ गोठा भेट, प्रदर्शनी भेट इत्यादीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणातून मिळालेले ज्ञान गावातील इतर शेतकरी बांधवांपर्यंत पोहचवून त्यांच्या व्यवसाय प्रगतीसाठी हातभार लावा आणि एकूणच स्वतःच्या उन्नती बरोबरच गावाच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्न करा असे मत डॉ. नंदकुमार गायकवाड यांनी या तीन दिवसीय प्रशिक्षणाच्या प्रमाणपत्र वितरण व सांगता समारंभ प्रसंगी व्यक्त केले. त्यांनी यापुढेही पशुपालकास विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबत उपस्थित पशुपालक शेतकऱ्यांना आश्वासित केले. यावेळी डॉ. प्रशांत मसारे, समन्वयक, उन्नत भारत अभियान, पशुवैद्यकीय महाविद्यालय उदगीर यांनीही प्रशिक्षणार्थीना मार्गदर्शन केले. सदर प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाबाबत प्रशिक्षणार्थीनी समाधान व महाविद्यालयाचे आभार व्यक्त केले तसेच या ज्ञानाचा वापर करून यापुढे दुग्धव्यवसायात वृद्धी करू अशी हमी प्रशिक्षणार्थीनी दिली. प्रास्ताविक डॉ. प्रफुल्लकुमार पाटील, प्रशिक्षण समन्वयक तथा नोडल अधिकारी दत्तक ग्राम पिंपरी यांनी केले. उदघाटन व सांगता समारंभाचे सूत्रसंचालन सह-समन्वयक डॉ. मत्स्यगंधा पाटील यांनी तर आभार प्रदर्शन सह-समन्वयक डॉ. रविराज सूर्यवंशी यांनी केले.

## वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यामंदिर शाळेचा सुरक्षित शाळा व स्टुडन्ट ऑफ रोड सेफ्टी पुरस्काराने सन्मान



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०१, माथेरान :** रायगड पोलीस आयोजित रस्ता सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत सुरक्षित शाळा व स्टुडन्ट ऑफ रोड सेफ्टी सन्मान सोहळा २०२५ बालगंधर्व रंगभवनरिलायन्स टाउनशिप नागोठणे ता. रोहा जि. रायगड येथे आदिती तटकरे मंत्री, महिला व बालविकास, महाराष्ट्र राज्य तसेच पोलीस अधीक्षक रायगड अलिबाग यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

या उपक्रमांतर्गत रायगड जिल्ह्यातून एकूण २८ शाळांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेचे वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यामंदिर, माथेरान या शाळेचाही गौरव करण्यात आला. नुकत्याच पार पडलेल्या मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा २०२४-२५ या उपक्रमात शाळेने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकवला होता. यानिमित्ताने अजून एक मानाचा तुरा सुरक्षित शाळा म्हणून नगरपरिषद आणि शाळेच्या शिरपेचात रोवला गेला आहे. सुरक्षित शाळेच्या नियमावलीत सीसीटीव्ही कॅमेरे, मुलामुलींसाठी स्वतंत्र टॉयलेट, मुलींच्या समस्यांसाठी स्वतंत्र महिला कर्मचारी नेमणूक इत्यादी मुद्द्याचा विचार केला गेला.

या भव्यदिव्य सन्मान सोहळ्यासाठी माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे, कार्यालय अधीक्षक सदानंद इंगळे, शाळेचे मुख्याध्यापक दिलीप आहिरे सर, संतोष चाटसे सर उपस्थित होते. मंत्री आदिती तटकरे व पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

## दर्शन व धनंजयला मिळाला पखवाज विशारदचा बहुमान

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०१, शहापूर (ठाणे) :** तालुक्यातील कृष्णाई पखवाज क्लासेसच्या दोन विद्यार्थ्यांनी अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळाच्या पखवाज वादन परीक्षेत विशारद पदवी मिळविली. शेलवली (खं) येथील दर्शन रामचंद्र पवार व कासगाव धनंजय बाळू घरत यांनी हे यश मिळविले. या वादकांना कृष्णाई पखवाज क्लासचे संचालक भास्कर घोडविंदे गुरुजी यांच्यासह ठाणे भूषण भाऊ बुवा कुर्ले व रायगड भूषण मंगेश बुवा बडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.त्यांच्या या यशाबद्दल सर्वस्तरातून कौतुक होत आहे.अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय पखवाज वादन परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले धनंजय घरत व दर्शन पवार या दोघानीही आपला शाळेचा अभ्यास करून नित्य नियमाने पखवाजचा सराव करत हे यश संपादन केलं.पखवाज हे सर्वात प्राचीन भारतीय पारंपारिक वाद्यांपैकी एक वाद्य आहे.हे वाद्य सध्याच्या संगीताच्या क्षणभंगुर ट्रेंडमुळे काहीसे विस्मृतीत गेल्यासारखे वाटत असले तरी संगीताच्या जगात त्याचे महत्त्व आबाधित आहे. पखावज हे हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या विविध शैलीतील एक न बदलता येणारे वाद्य असल्याचे दर्शन आणि धनंजय यांनी प्रतिनिधिशी बोलतांना सांगितले.

# प्रत्येक आई जागी झाली तर सकारात्मक परीवर्तन होणारच - वैदेही सावंत



**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.३१, पुणे :** समाजात स्त्रियांचे स्थान बदलत चालले असले तरी स्त्रियांना त्रासदायक अशा अनेक अनिष्ट प्रथा आजही चालू आहेत. विशेषतः विधवांना समाजात अत्यंत क्लेशदायक पद्धतीने वागवले जाते. त्यांच्या मनाचा विचार न करता काही विशिष्ट कार्यक्रमात त्यांना सामावून घेतले जात नाहीच शिवाय त्यांना वेगळी अशी अवमानकारक वागणूक मिळते. सवाष्ण नसणं हा तिचा दोष नसतानाही समाजात काही अनिष्ट प्रथांमुळे तिला माणूस म्हणून आपला समाज वागवताना दिसत नाही. हे बदलायचं असेल तर प्रत्येक स्त्रिने बोलायला शिकले पाहिजे आणि प्रत्येक आई जागी झाली तर समतेच्या दिशेने सकारात्मक परीवर्तन होऊ शकते असे विचार वैदेही सावंत यांनी मांडले.

साने गुरुजी प्राथमिक शाळा, चक्रभेदी फाऊंडेशन देवरुख व इनरव्हील क्लब पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्र सेवा दल संचालित साने गुरुजी प्राथमिक शाळेतील बॅ नाथ पै सभागृहात अनोख्या अशा तीळगुळ समारंभाचे आयोजन करण्यात आले होते त्या वेळी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. शिव्या देणे बंद केले पाहिजे, वाईट प्रथा बंद व्हाव्यात म्हणून प्रबोधन केले पाहिजे व समाजात हळूहळू बदल घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पुढे आले पाहिजे. शासनाच्या वतीने दिलेल्या विविध योजनांचा अशा विधवा परित्यक्ता असहाय्य महिलांना लाभ मिळवून दिला पाहिजे असे विचार पुढे बोलताना त्यांनी मांडले.

यावेळी शासनाच्या बालकल्याण अधिकारी संगिता जाधवर मॅडम यांनी बाल संगोपन योजना,लेक लाडकी योजनांसारख्या महिलांना उपयुक्त अशा विविध योजनांची माहिती दिली.परित्यक्तांचे पूनर्वसन व्हावे म्हणून शासनाच्या वतीने योजना सुरू आहेत मात्र गरजू महिला याचा लाभ घेताना दिसत नाही याबाबत त्यांनी भाष्य केले.

यावेळी काही विधवा, परित्यक्ता महिलांचा गजरा माळवून तसेच साडी देऊन सन्मान करण्यात आला. विधवांनाही हा मान मिळावा, संक्रांतीच्या हळदीकुंकू समारंभात त्यांची अवहेलना होऊ नये व अशा स्वरूपाच्या अनिष्ट प्रथा बंद व्हाव्यात या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उपस्थित सर्व महिलांना वाण म्हणून साडी देऊन सन्मानित करण्यात आले. अनामिका जानराव यांनी पालकांच्या वतीने सुंदर मनोगत व्यक्त केले. विधवा महिलांचा अशा पद्धतीने सन्मान होताना संपूर्ण सभागृह सद्गदित झाले.पाहुण्यांनाही अश्रू अनावर झाल्याचे चित्र सभागृहाने पाहिले. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून राष्ट्र सेवा दल संचलित शिक्षण प्रशासक मंडळाचे सचिव मा शिवाजी खांडेकर उपस्थित होते. तसेच व्यासपीठावर मुख्याध्यापिका मीना काटे, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा प्रिती शिरोडकर, स्वाती हिरवे, चित्रा आदमाने, संगिता गोवळकर, चक्रभेदी फाऊंडेशन च्या सदस्या प्रभावती उबाळे, संस्थेचे संचालक तुषार शिंदे, प्रज्ञा वझे, निलेश शेकदार, अविनाश खंडारे, सोपान बंदावणे उपस्थित होते.

कार्यक्रमाची संकल्पना मांडणाऱ्या मुख्याध्यापिका मीना काटे यांनी स्वागत प्रास्ताविक केले. संपूर्ण उपक्रमाचे सुंदर नियोजन करणाऱ्या संगिता गोवळकर यांनी सूत्रसंचालन केले तर शितल खेडकर यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुषमा शिंगाडे, पूनम कदम, सारिका नांगरे यांचे मोठे सहकार्य लाभले तसेच संजय ससे, विठ्ठल शेवते, तेजस्विनी फलफगर या शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

# अर्च फाऊंडेशन - इंडोरामा वेंचरच्या पुढाकाराने युरेका सायन्स क्विझ - २०२५ स्पर्धा उत्साहात संपन्न

## गायत्री विद्या मंदिर भांडुप शाळेचा प्रथम क्रमांक




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, मुंबई :** अर्च फाऊंडेशन (वडोदरा) व इंडोरामा वेंचरच्या पुढाकाराने युरेका सायन्स क्विझ - २०२५ स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली.

उडान प्रकल्प अंतर्गत घेण्यात आलेल्या या आंतरशालेय विज्ञान क्विझ स्पर्धेत आयडील हायस्कूल, गायत्री विद्या मंदिर, सरस्वती विद्यालय भांडुप, सरस्वती विद्या निकेतन घाटकोपर, व्यंकटेश विद्यालय, सरस्वती विद्या निकेतन विक्रोळी, विद्यादीप विद्यालय, अग्रसेन हिंदी विद्यालय, राजीव गांधी विद्यालय, विवेक विद्यालय विक्रोळी या दहा शाळांच्या प्रत्येकी १० जोड्या सहभागी झाल्या होत्या.

पहिल्या (लेखन) फेरीत सर्वोच्च गुण मिळवलेल्या प्रत्येकी शालेय तीन जोड्यांची नॉकआउट व अंतिम फेरी २९ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ८:३० ते सायंकाळी ४:३० या वेळेत शहीद स्मारक सभागृह, रमाबाई आंबेडकर नगर, घाटकोपर पूर्व येथे पार पडली.

स्पर्धेत सहभागी प्रत्येक शाळेतील एक मुख्य आणि दोन सहयोगी संघ होते. या स्पर्धेसाठी प्रकल्प समन्वयक सरिता पासी, मयंक पटेल, रिद्धी सेठ, सुषमा तिवारी तसेच सहभागी शाळांचे शिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी ISC, APAC आणि China पुरवठा साखळी प्रमुख विशाल शर्मा, HPC आणि Coating - APAC ANZ विपणन व्यवस्थापक राहुल सली, मानव संसाधन सहायक व्यवस्थापक आर्या मोरे, कार्यकारी कोषागार सुधा नायर, व्यवसाय समर्थन कार्यकारी अनामिका कुलकर्णी, रसद व गोदाम व्यवस्थापक सुनील बछाव आणि सामाजिक कार्यकर्ते प्रवीण यादव हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात अर्च फाऊंडेशनच्या सीईओ आणि संचालक सोंकी शहा यांच्या शुभेच्छांद्वारे झाली. विविध चार फेऱ्यांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. अंतिम निकालानुसार,

**तृतीय क्रमांक :** सरस्वती विद्या निकेतन विक्रोळी व सरस्वती विद्या निकेतन घाटकोपर (कांस्य पदक व प्रमाणपत्र)

**द्वितीय क्रमांक :** अग्रसेन हिंदी विद्यालय (रजत पदक व प्रमाणपत्र)

**प्रथम क्रमांक :** गायत्री विद्या मंदिर, भांडुप (सुवर्ण पदक, प्रमाणपत्र व विजेतेपद ट्रॉफी)

स्पर्धेतील सर्व सहभागींना भेटवस्तू, प्रमाणपत्रे व लेखन साहित्य प्रदान करण्यात आले. तसेच, उपस्थित अतिथींना तुळशी रोप देऊन सन्मानित करण्यात आले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून त्यांना विज्ञान व ज्ञानाच्या क्षेत्रात प्रोत्साहन देणारा अनुभव मिळाला.

# पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा व मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना रोजगार मेळावा संपन्न



**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.३१, जव्हार (पालघर) :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार, व जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र पालघर आणि भगवान बिरसा मुंडा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था जव्हार यांच्या संयुक्त विद्यमानाने, जव्हार, मोखाडा, विक्रमगड आणि वाडा तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या दृष्टीने शुक्रवार दिनांक ३१/०१/२०२५ रोजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था जव्हार येथे रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन करिष्मा नायर (भा.प्र.से.) प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय जव्हार, यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना श्याम अंबाळकर यांनी केली.सदर मेळाव्यासाठी लोखंडे इंडस्ट्रीज, गोविंदास एच आर सर्विसेस, एम एस आर टी सी पालघर, ब्लू स्टार वाडा, ई पी एल लिमिटेड, आस्था हॉस्पिटल, नवनीत EDU, आयशर मोटर्स नाशिक, अण्णासाहेब पाटील महामंडळ पालघर, अलाईड प्लेसमेंट अँड एच आर सर्विसेस, ऑल इन वन प्लेसमेंट, सक्सेस जॉब प्लेसमेंट. अशा एकूण १२ आस्थापनांनी सहभाग घेतला. एकूण ३६५ उमेदवारांनी यात आपला सहभाग नोंदविला. त्यातून २१८ उमेदवारांना नोकरीची संधी प्राप्त झाली. करिष्मा नायर मॅडम यांनी मुलांना रोजगाराच्या आणि व्यक्तिमत्व विकास तसेच आजच्या युगातील आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि चॅट जी पी टी याचा आपण आपल्या जीवनामध्ये कशा तऱ्हेने उपयोग करू शकतो, याचे मार्गदर्शन केले.

दीपक टिके सहाय्यक प्रकल्पाधिकारी यांनी सदर संधीचे सोने करावे असे गुरुमंत्र दिला.सदर मेळाव्यामध्ये नरेंद्र शिरसाट कौशल्य विकास को-ऑर्डिनेटर यांनी इस्त्रायल येथे मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याबाबत माहिती दिली. तसेच संस्थेचे प्राचार्य अंबाळकर यांनी या रोजगार मेळाव्याचा जास्तीत जास्त उमेदवारांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले.

रोजगाराभिमुख आणि महत्त्वकांक्षी या प्रकल्पात दहावी, बारावी, आयटीआय, पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण झालेले विविध उमेदवारांनी या रोजगार मेळाव्यात उपस्थित राहून संधीचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पडवळ सर आणि आभार प्रदर्शन संपदा मरगडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय जव्हार, औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभाग या सर्व संस्थेतील सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद आणि प्रशिक्षणार्थी यांनी सहकार्य केले.

# शासनाकडून विद्यार्थ्यांची भोपाळ शैक्षणिक सहल..

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०१, माथेरान :** माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेचे,वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यामंदिर,माथेरान या शाळेने मुख्यमंत्री, माझी सुंदर शाळा सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात प्रथम क्रमांक पटकवला. त्यामुळे शाळेतील १३ विद्यार्थी आणि एक शिक्षक यांची राज्याबाहेर मध्यप्रदेश, भोपाळ येथे राष्ट्रीय अविष्कार अभियानातांर्गत शैक्षणिक अभ्यास दौऱ्यासाठी माननीय शिक्षणाधिकारी पुनिता गुरव मॅडम यांच्याद्वारे निवड करण्यात आली होती. या अभ्यास दौऱ्यासाठी संपूर्ण रायगड जिल्ह्यातून विशेष प्रविण्य मिळवलेल्या ६ शाळातील एकूण ४५ विद्यार्थी आणि ७ शिक्षकांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी १३ विद्यार्थी वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यामंदिर, माथेरान शाळेचे होते. ही सर्व माथेरानकरांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. शाळेचे विद्यार्थी बाहेर राज्यात रायगड जिल्हा परिषद नव्हे तर आपल्या राज्याचे प्रतिनिधित्व करत होते ही विशेष बाब होती. या अभ्यास दौऱ्यात १३ विद्यार्थी आणि एक शिक्षक(संतोष चाटसे) यांची निवड मुख्याध्यापक दिलीप आहिरे यांनी केली.या अभ्यास दौऱ्यात अनेक प्रसिद्ध ऐतिहासिक, वैज्ञानिक ठिकाणाना भेटी देण्यात आल्या. नाशिकचे ऐतिहासिक काळाराम मंदिर, सिहोर चझ. गहू शेती, राष्ट्रीय विज्ञान केंद्र, भोपाळ, इंदिरागांधी मानवविकास संस्था, विथी भोपाळ, विभागीय राष्ट्रीय शैक्षणिक परिषद, भोपाळ, प्रसिद्ध ऐतिहासिक सांची स्तूप,सांची,कर्कवृत रेषा,आशिया खंडातील सर्वात मोठी आणि जगातील तिसऱ्या क्रमांकाची ताजूल मज्जीद, प्रगैतिहासिक इतिहासाची साक्ष देणारे ठिकाण भीमबेटका इत्यादी मुख्य ठिकाणाना भेटी देण्यात आल्या. मुख्यमंत्री, माझी सुंदर शाळा उपक्रमात आपल्या शाळेचा जिल्ह्यात प्रथम क्रमांक यावा यासाठी मा.मुख्याधिकारी राहूल इंगळे यांनी सर्वातोपरी मदत केली. तसेच अधीक्षक सदानंद इंगळे यांनी शाळेला वेळोवेळी भेटी देऊन मोलाचे सहकार्य केले. शाळेचे मुख्याध्यापक दिलीप आहिरे आणि सर्व शिक्षकवृंद यांनी राष्ट्रीय अविष्कार अभियानाअंतर्गत मध्यप्रदेश भोपाळ अभ्यास दौऱ्यावरून परत आलेल्या सर्व १३ विद्यार्थी आणि शिक्षक संतोष चाटसे यांचे अभिनंदन केले.

# ज्येष्ठ नागरिक स्नेहमेळावा उत्साहात संपन्न...

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०१, करावे (नवी मुंबई) :** ज्येष्ठ नागरिकांना अनेक कौटुंबिक, सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे त्यांना मानसिक आधार देण्याची गरज असून विरंगुळा केंद्रांच्या माध्यमातून समवयस्क लोक एकत्र येतात, भेटतात, सुख-दु:खाच्या गोष्टी करतात, त्यामुळे त्यांना मानसिक दिलासा मिळतो. नवी मुंबई महानगरपालिकेचे हे काम ज्येष्ठांप्रती आपुलकी दर्शविणारे असून यापुढे जात ज्या ज्येष्ठांना काही अडचणींमुळे १५-२० दिवस राहण्यासाठी व त्यांची काळजी घेण्यासाठी एखादे केंद्र असावे या संकल्पनेतून ओल्ड एज होम अर्थात ज्येष्ठ नागरिक काळजी केंद्राची कल्पना पुढे आली, असे सांगत आमदार मंदाताई म्हात्रे यांनी ही सुविधा नागरिकांना उपलब्ध झाल्याचा आनंद व्यक्त केला. ही संकल्पना मांडण्यापासून, जागा उपलब्ध करुन घेण्यापासून हे केंद्र कार्यान्वित होईपर्यंत विविध टप्प्यांवर स्वत: पुढाकार घेऊन केलेल्या कार्यवाहीचा तपशील त्यांनी यावेळी सांगितला.

नवी मुंबई महानगरपालिका समाजविकास विभागाच्या वतीने से.२८ करावे तलावानजीक सीवूड नेरुळ याठिकाणी उभारण्यात आलेल्या वृद्धाश्रमामध्ये आयोजित ज्येष्ठ नागरिक स्नेह मेळाव्याप्रसंगी बेलापूर विधानसभा सदस्य मंदाताई म्हात्रे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना ज्येष्ठ नागरिकांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे, महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे व मुंबई – नवी मुंबई प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष सुरेश पोटे, बेलापूर विभागाचे सहा.आयुक्त डॉ.अमोल पालवे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.




याप्रसंगी बोलताना अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी नवी मुंबईतील ज्येष्ठ नागरिकांचा इतरांना हेवा वाटावा अशा प्रकारचे कार्य येथील ज्येष्ठ नागरिकांसाठी होत असून सानिध्य, स्पर्श व संवाद या तीन गोष्टी ज्येष्ठांसाठी महत्वाचे असल्याचे लक्षात घेत विरंगुळा केंद्रासारखी संकल्पना तसेच वृद्धाश्रमासारखी सुविधा उपलब्ध करुन देऊन महानगरपालिकेने ज्येष्ठांप्रती आपला आदरभाव व्यक्त केला असल्याचे त्यांनी सांगितले. रस्ते, गटारे, दिवाबत्ती अशा सुविधा कामांच्या पलिकडे जाऊन समाजविकासासाठी भरीव काम करणे हे नवी मुंबई महानगरपालिकेचे वैशिष्ट असून यापुढील काळात ज्येष्ठ नागरिकांचे सर्वेक्षण करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे अद्यावत आरोग्य सुविधा आता उपलब्ध होत असून औषधोपचारामुळे आयुमर्यादाही... आयुमनिही वाढत असल्याचे मत व्यक्त करीत यापुढील काळात ज्येष्ठ नागरिकांची वाढती संख्या लक्षात घेऊन तशा प्रकारचे नियोजन शासन, प्रशासनाला करावे लागेल असेही ते म्हणाले.

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांनी नवी मुंबई इतक्या ज्येष्ठ नागरिकांकरिता सुविधा कोणत्याच शहरात उपलब्ध करुन दिल्या जात नाहीत असे स्पष्ट करीत ज्येष्ठांसाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती दिली. विरंगुळा केंद्राप्रमाणेच वृद्धाश्रम ही चांगली सुविधा असून त्याचा लाभ मोठ्या प्रमाणात होईल असेही ते म्हणाले.

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या मुंबई – नवी मुंबई प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष सुरेश पोटे यांनी ही वास्तू ज्येष्ठ नागरिकांना मायेचा आधार देणारी होईल असे सांगितले.

समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे यांनी ज्येष्ठांकरिता महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. ज्येष्ठ नागरिक स्वतंत्र कक्षाद्वारे ज्येष्ठांना आपले म्हणणे मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्धता, विविध सोयीसुविधांनी युक्त ३४ ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रे, एनएनएमटी प्रवासी बस भाडयात १००% सवलत, महानगरपालिका रुग्णालयांमध्ये मोफत आरोग्य सुविधा तसेच उपचारांसाठी अग्रक्रम, शासनाच्या मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना व मुख्यमंत्री वयोश्री योजना यांची प्रभावी अंमलबजावणी, ज्येष्ठांच्या अंगभूत कला, क्रीडागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध स्पर्धा उपक्रमांसह जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाचे आयोजन अशा विविध कामांची माहिती त्यांनी प्रास्ताविकपर मनोगतात दिली.

या स्नेहमेळाव्याप्रसंगी नवी मुंबईतील विविध ज्येष्ठ नागरिक संघटनांचे पदाधिकारी व ज्येष्ठ नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# थोडक्यात

## सामाजिक कार्यकर्ते नवनाथ वाळुंज यांचे अन्नत्याग उपोषण




**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.०१, आळेफाटा (पुणे) :** आळेफाटा बसस्थानकातील दुकाने तातपुरत्या स्वरुपात इतर ठिकाणी हलवून व अतिक्रमणे काढून संपुर्ण बसस्थानकाचे काँक्रेटिकरणाचे उत्कृष्ट व दर्जेदार काम करण्यासाठी अनेकदा पत्र व्यवहार व विनंती करून देखील कामाकडे दुलर्क्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरोधात नवनाथ दादाभाऊ वाळुंज हे येथील बसस्थानकात अन्नत्याग उपोषणास बसले आहेत. याबाबत वाळुंज यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, एमआयडीसीच्या माध्यमातून येथील बसस्थानकाच्या कॉक्रीटीकरण यासाठी जवळपास एक कोटीचा निधी उपलब्ध झाला असून येथील बस स्थानकाचे काम अपूर्ण असताना बस स्थानक वापरासाठी खुले करण्यात आलेले आहे. येथील बस स्थानकातील अतिक्रमणे काढून स्थानकातील दुकाने तात्पुरत्या स्वरूपात इतर ठिकाणी हलवून या जागेचे मोजणीकरून स्थानकातील अतिक्रमणे काढून संपूर्ण बस स्थानकाचे काम करून घ्यावे व संपुर्ण काम होईपर्यंत स्थानकाच्या कामाचा पूर्णतः वाचा दाखला ठेकेदाराला देऊ नये. अशा विविध मागण्यांसाठी उपोषण बसलो असल्याचे सांगितले. यावेळी त्यांच्या समवेत अविनाश चौगुले, सचिन देवकर, ग्रा.सदस्य संतोष पादीर, ग्रा.सदस्या निशाताई वाळुंज, कांचन अंतुले, प्रशांत देवकर, किसन चौगुले, पंकज चौगुले, गणेश गोफणे, विपुल येलमर, अजित जठार, सुशांत मंडले, संतोष शिंदे, दिलीप चौगुले, अजित नलावडे, दिनेश कुऱ्हाडे, अतुल चौगुले, राम पाटील चौगुले, अशोक कुटे, सीताराम वाळुंज, ॲड.रवींद्र नायकोडी, डॉ.पानसरे, लाखन जंगम, सामाजिक कार्यकर्ते डी.बी. वाळुंज आदी मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते.

## गणेश जयंतीच्या दिवशी चोळेगाव तलाव विसर्जनासाठी बंद; भक्तांची गैरसोय



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०१, ठाकुर्ली (ठाणे) :** गणेश जयंतीच्या दिवशी चोळेगाव तलावाच्या पुनरुज्जीवनाचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे ठाकुर्ली, चोळेगाव आणि आजदे येथील गणेश भक्तांसाठी विसर्जनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. गणेश जयंती दिवशी अचानक तलाव दुरुस्तीचे काम सुरू झाल्याने भाविकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने गणेश विसर्जन आणि जलसंधारणासाठी तलावाच्या स्वच्छता आणि दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. परंतु, हे काम गणेश जयंती दिवशी सुरू झाल्याने स्थानिक नागरिक नाराज झाल्याचे दिसून आले. राजकीय पक्षाकडून ही महानगर पालिकेवर टीका होत असल्याचे दिसून आले. रहिवाशांना विसर्जनासाठी पर्यायी व्यवस्था मिळणार का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. नागरिकांच्या समस्या आणि अपेक्षा ठाकुर्ली, चोळेगाव आणि आजदे परिसरातील शेकडो भक्तगण गणेश जयंतीनिमित्त विशेष पूजन आणि विसर्जन करतात. तलावाच्या कामामुळे विसर्जनासाठी इतर ठिकाणी जावे लागणार असल्याने भाविकांची गैरसोय होणार आहे. महानगरपालिका प्रशासनाने सांगितले की, चोळेगाव तलावाची स्वच्छता आणि नूतनीकरण २ महिन्यात पूर्ण करायचे ठरवले आहे.

## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत धानिवरी शाळेतील विद्यार्थिनींची उल्लेखनीय कामगिरी




**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०१, डहाणू (पालघर) :** हैदराबाद येथे झालेल्या नांदी फाऊंडेशनच्या पाचव्या नन्ही कली तुफान गेम्स क्रीडा स्पर्धेत पालघर जिल्ह्यातील धानिवरी जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत राज्य पातळीवर आपली छाप उमटवली आहे. डहाणू तालुक्यातील दुर्गम भागातील या विद्यार्थिनींनी अपुऱ्या सोयीसुविधा आणि कठीण परिस्थितीवर मात करत आपले कौशल्य सिद्ध केले.

**राष्ट्रीय स्तरावर दमदार कामगिरी**

या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी देशभरातील ८ राज्यांमधून विद्यार्थी निवडले गेले होते. महाराष्ट्रातून एकूण २० विद्यार्थ्यांची निवड झाली, त्यात धानिवरी शाळेच्या पाच विद्यार्थिनींचा समावेश होता. त्यांनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये आपल्या जिद्दीच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले.

**विद्यार्थिनींच्या उत्तुंग यशाची नोंद:**

भाग्यश्री कैलास मलावकर – शटल रनमध्ये प्रथम क्रमांक, ५ मिनिटे धावणे (एंड्युरन्स) मध्ये द्वितीय क्रमांक, ५० मीटर जलद धावणे (स्प्रिंट) मध्ये तृतीय क्रमांक, उभी लांब उडी (स्टँडिंग लॉन्ग जंप) मध्ये चतुर्थ क्रमांक.अनिता गोविंद पागी – ५ मिनिटे धावणे (एंड्युरन्स) मध्ये द्वितीय क्रमांक.

निकिता सुदेव मलावकर – ५० मीटर जलद धावणे (स्प्रिंट) मध्ये चतुर्थ क्रमांक.

ऋतिका देविदास तांबडा – ५० मीटर धावणे स्पर्धेत तृतीय क्रमांक.

शिल्पा हरेश काटेला – ५ मिनिटे धावण्याच्या स्पर्धेत

**सेमीफायनल पर्यंत मजल.**

या विद्यार्थिनींच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची असून, बहुतांश पालक विटभट्टीवर मजुरीचे काम करतात. प्रतिकूल परिस्थिती असूनही या विद्यार्थिनींनी आपल्या जिद्द, मेहनत आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर आपले स्थान निर्माण केले आहे.

विशेष म्हणजे, या विद्यार्थिनींना नन्ही कली प्रकल्पांतर्गत नांदी फाउंडेशनमार्फत स्वयंसेवक म्हणून कार्यरत असलेल्या शुभांगी धर्मा तांबडा यांनी प्रशिक्षण दिले. त्यांचे अथक प्रयत्न आणि मार्गदर्शन विद्यार्थिनींच्या यशात महत्त्वाची भूमिका बजावतात. धानिवरी शाळेच्या या गुणवंत विद्यार्थिनींच्या अभूतपूर्व कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. त्यांचे यश पालघर जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरले असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

## शिरूरमध्ये मिस्त्रीने १३ वर्षीय मुलीवर बलात्कार केल्याचा आरोप, आरोपी अटक

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.०१, शिरूर (पुणे) :** शिरूर तालुक्यातील काठापुर येथे एका घराचे काम करणाऱ्या सुरेश भगवान ढोकणे (वय ३९, रा. नागापूर, ता. जि. बीड) या मिस्तरीने घरातील १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचा लैंगिक छळ करुन बलात्कार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याबाबत शिरूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी सुरेश ढोकणे याला शिरूर पोलिसांनी तत्परतेने शोध घेत बेड्या ठोकल्या आहे.

याबाबत सविस्तर हकीगत अशी की, २७ डिसेंबर २०२४ पासून २२ जानेवारी २०२५ रोजी पर्यंतच्या कालावधीमध्ये वेळोवेळी शिरूर तालुक्यातील काठापूर खुर्द या ठिकाणी फिर्यादी यांच्या राहत्या घराच्या हॉलमध्ये मिस्त्री काम करण्यासाठी आलेल्या सुरेश भगवान ढोकणे (वय ३९, रा. नागापूर, ता. जि. बीड) याने अल्पवयीन १३ वर्षीय मुलीवर बलात्कार केला आहे.

दरम्यान, याबाबत गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तत्काळ आरोपीस अटक केली आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक करांडे हे करत आहेत.

## राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेपासून १० वी चे विद्यार्थी वंचित

**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.०१, मुंबई :** नाशिक जिल्हा कबड्डी असोसिएशन आणि महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने २३ ते २७ फेब्रुवारी २०२५ रोजी नाशिक येथील मनमाड, नगर परिषद मैदानात ३५ वी किशोर / किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

सदर स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून एकूण ३२ जिल्हे सहभागी होणार आहेत. परंतू या कालावधीत दहावी बोर्डाच्या परीक्षा असल्यामुळे दहावीचे विद्यार्थी या स्पर्धेपासून वंचित राहणार आहेत. या विद्यार्थ्यांना स्पर्धेत खेळता येणार नाही. स्पर्धेच्या नियमावलीनुसार २००९ चे खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. परंतु दहावीच्या विद्यार्थ्यांची ही संधी परीक्षेमुळे हुकणार आहे. महाराष्ट्रातून २०० पेक्षा अधिक खेळाडू हे दहावीची परीक्षा देत आहेत.त्यामुळे या खेळाडूंना महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार मिळणारे ग्रेसमार्क मिळणार कसे असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यात काही सिनियर खेळाडू असून त्यांचे हे शेवटचे वर्ष आहे. त्यामुळे सदर स्पर्धा बोर्डाच्या परीक्षेपूर्वी घेण्यात याव्यात अशी मागणी खेळाडू,पालक व प्रशिक्षक यांच्याकडून केली जात आहे. स्पर्धा आयोजक व महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन यांनी खेळाडूचा विचार करावा.

## अन्नपूर्णा बचत गटाचा हळदी कुंकू समारंभ संपन्न...

**अक्षराज : देवयानी कुलकर्णी.**

**दि.०१, खारघर (रायगड) :** अन्नपूर्णा बचत गट खारघर यांच्या वतीने हळदी कुंकू समारोहाचे आयोजन करण्यात आले होते. अतिशय आनंदात व उत्साहात हा समारोह पार पडला.

साधारणता २०१३ पासून अन्नपूर्णा बचत गटाची सुरुवात झाली होती आणि त्यावेळेस अगदी पाच ते सात महिला सदस्या जोडल्या गेल्या होत्या आणि बघता बघता आता मात्र त्यांनी शंभरी पार केली आहे. अगदी सुरुवातीपासूनच या गटाच्या अध्यक्षा श्रद्धा सावंत या, या बचत गटाची संपूर्ण धुरा सांभाळत आहेत. अन्नपूर्णा महिला गटात वर्षभरात विविध कार्यक्रम राबविले जातात. वेगवेगळी शिबिरे, महिला दिन, सावित्रीबाई फुले जयंती, लहान मुलांचे आधार कार्ड काढणे, अपडेट करणे, हळदीकुंकू समारोह असे वेगवेगळे कार्यक्रम होतच असतात.




दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गटातील सर्व महिलांनी हळदी कुंकु कार्यक्रमासाठी हजेरी लावली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधुरी जाधव यांनी तर रांगोळी तथा सजावट तनिषा सावंत यांनी केले.प्रमुख पाहुणे पत्रकार देवयानी कुलकर्णी यांच्या उपस्थितीत सर्व स्त्रियांनी एकमेकिंना हळदी कुंकू लावून व वाण आणि तिळगुळ देऊन संक्रांतीच्या तसेच नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच लहान मुलांसाठी खेळांचे आयोजनही करण्यात आले होते. व मुलांना अभ्यास करण्यास उत्स्फूर्त करण्यासाठी म्हणून उत्तम गुणांनी उत्तीर्ण झालेल्या मुलांना त्यांचे कौतुक करून छोटेसे बक्षीसही प्रदान करण्यात आले.

या हळदीकुंकू समारोहाची सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्व स्त्रियांनी एकत्र येऊन एकमताने असे ठरवले आहे की, आपल्याला वर्षभर जमेल तेवढी रक्कम आपण जमा करायची आणि संक्रांतीच्या हळदी कुंकू समारोह्याच्या निमित्ताने तसेच नववर्षाच्या निमित्ताने ही जमा झालेली सर्व रक्कम एखाद्या लहान मुलांच्या अनाथालयाला किंवा संस्थेला जाऊन सुपूर्द करायची. कारण लहान मुलेच आपलं उद्याच भविष्य आहेत. तर आज त्यांच्या भविष्यासाठी आपण प्रयत्न करणे जरुरीचे आहे.

या निर्णयामुळेच या कार्यक्रमाला चार चांद लागले आहेत तसेच या गटाचे सर्वात्र कौतुक होत आहे. आणि त्यांचा हा निर्णय अगदी योग्य व स्वागतार्ह आहे. आशा विचारांनीच समाज सुदृढ होणार आहे.

## दहावी, बारावीच्या संवेदनशील केंद्रांवर आता 'ड्रोन'ची नजर

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, अहिल्यानगर :** इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेसाठीच्या संवेदनशील परीक्षा केंद्रांवरील कॉपी व इतर गैरप्रकार रोखण्यासाठी आता पोलिसांसोबतच ड्रोनचा वापर केला जाणार आहे. ज्या केंद्रांवर अनेकदा बाह्य उपद्रव जाणवतो, तेथे केवळ पोलीस बंदोबस्त ठेवणे पुरेसे होत नसल्याने आता 'ड्रोन' कॅमेऱ्यांद्वारे या परिसरावर नजर ठेवली जाणार आहे. याशिवाय या परीक्षांच्या सर्वच केंद्रांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावत 'वेबकास्टिंग' करण्याचा निर्णय ही शासनाकडून घेण्यात आला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात १०७ केंद्रांवर गैरप्रकार होत असल्याचे शिक्षण विभागाच्या निदर्शनास आले आहे. यामुळे या केंद्रांवर यंदा नव्या तंत्रांचा वापर केला जाणार असल्याचे जिल्हा प्रशासनाने जाहीर केले आहे. १० वी व १२ वी परीक्षेत कॉपीमुक्त अभियानासाठी विविध उपाययोजना राबवण्याची जबाबदारी राज्य परीक्षा मंडळाने स्थानिक पातळीवर जिल्हाधिकाऱ्यांवर टाकली आहे. परीक्षेतील या उपाययोजनांसाठी जिल्हा दक्षता समितीची बैठक जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे सीईओ आशिष येरेकर, शिक्षणाधिकारी अशोक कडूस (माध्यमिक), भास्कर पाटील (प्राथमिक) व बाळासाहेब बुगे (योजना), पोलीस निरीक्षक खेडकर आदींच्या उपस्थितीत झाली. या संदर्भात माहिती देताना शिक्षणाधिकारी कडूस यांनी सांगितले , की १२ वीची परिक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान होत आहे. त्यासाठी जिल्ह्यात १०९ केंद्रावर ६३ हजार ६८५ परीक्षार्थी आहेत, तर १० वीची परिक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च दरम्यान होत आहे. त्यासाठी जिल्ह्यात १८४ केंद्रावर ६८ हजार ९९१ परीक्षार्थी आहेत. गेल्या पाच वर्षांत सन २०१८ पासून ( करोनाचा सन २०२१ व २०२२ चा कालावधी वगळता) गेल्या पाच वर्षांत १०७ केंद्रावर गैरप्रकार आढळून आले. विशेषतः केंद्राबाहेरून , जमावाकडून परीक्षार्थींना कॉपी पुरवण्याचा प्रकार होतात. परीक्षा केंद्रांना जमावाचा त्रास जाणवतो. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी ड्रोनचा वापर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

> परिक्षा प्रक्रियेत अडथळा आणणाऱ्या उपद्रवी घटकांचा बंदोबस्त केला जाईल. त्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. गैरप्रकारात सहभागी परीक्षा केंद्राची मान्यता रद्द करण्याबरोबरच गैरप्रकारात सहभागी शाळेंची मान्यता रद्द करण्याचाही प्रस्ताव पाठवला जाईल.
>
> **– सिध्दाराम सालीमठ, जिल्हाधिकारी, अहिल्यानगर**